# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र. मुमाआ/नों. क्र. २५६६/१९/अ. क्र. १४७८/२२/०१

**Shri. Qureshi Mohd. Tahir Abdul Gani**
(Mukima Bai) Ramzan Building, Qureshi Nagar,
Kurla (East) Mumbai — ४०००७०.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) एल विभाग**
एल विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, एल विभाग कार्यालय इमारत,
लक्ष्मणराव यादव मंडई, पहिला मजला, स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (प), मुंबई ४०० ०७०.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता एल विभाग**
एल विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, एल विभाग कार्यालय इमारत,
लक्ष्मणराव यादव मंडई, पहिला मजला, स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (प), मुंबई ४०० ०७०.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २५.०१.२०२२/०३.०३.२०२२/३१.०३.२०२२**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

उक्त प्रकरणी दिनांक २५.०१.२०२२ रोजी आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:

"अपीलकर्त्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम-६(१) अन्वये दि. ०१.१२.२०१८ रोजी जन माहिती अधिकाऱ्याकडे माहिती अर्ज सादर केला. सदर अर्जान्वये त्यांनी, "More than three complaint request for demolition of illegal unauthorized extra gallary with shed of 3X36=108 sq. area at 1st floor of Abdul Gani Ramjan Building which constructed with the help of Se. Shr. Patil and Jr. Eng. Shri. Sagre Saheb-Mukadam Shri. Pawar and other MCGM authorities who jointly severally gate the corruption of Rs. 1,00,000/- (Rs. 1,000/-) p.sq.ft Area which complaint pending since 09.07.2018 complaint xerox copy attached on page no. 8 to 8 आणि इतर बाबत" सविस्तर माहिती/कागदपत्रांची मागणी केलेली होती.

अपीलकर्त्याने आयोगाकडे दि. ०६.०५.२०१९ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले असून त्याद्वारे असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांचे उत्तर आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे आदेश धारीकेमध्ये दिसून येत नाही.

दृकश्राव्य माध्यमाद्वारे व्दितीय अपील अर्जाच्या सुनावणीच्या वेळी अपीलकर्त्याने असे विशद केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित असलेली माहिती प्राप्त झालेली नाही.

आजच्या सुनावणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. यास्तव अपीलाची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेल्या माहितीसह उपस्थित राहावे. सदर **अपीलाची पुनर्सुनावणी दिनांक ०३.०३.२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता** आयोजित करण्यात येत आहे. तरी अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी स्वत: उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील."

उक्त प्रकरणी दिनांक ०३.०३.२०२२ रोजी आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:

"आजच्या पुनर्सुनावणीस अपिलकर्ता यांनी असे विशद केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) एल विभाग, श्री. किरण अन्नमवार उपस्थित असून त्यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, पुढील १५ दिवसात संबंधित जागेचे स्थळ निरिक्षण करावे आणि स्थळ निरिक्षण अहवाल व पुढील कार्यवाहीची माहिती अपिलकर्ता यांना नि:शुल्क देण्यात यावी.

तरी अपिलाची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. सदर **अपिलाची पुनर्सुनावणी दिनांक ३१.०३.२०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजता** आयोगात प्रत्यक्ष आयोजित करण्यात येत आहे. तरी अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वत: उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील."

आजच्या पुनर्सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) एल विभाग, श्री. किरण अन्नमवार उपस्थित असून त्यांनी असे विशद केले की, त्यांना संबंधित बांधकामाच्या पत्त्यांचा स्पष्ट बोध होत नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांना दिनांक ०६.०४.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता त्याच्या कार्यालयात बोलविण्यात आले. तसेच त्या जागेचे ठिकाण निश्चित झाले तर त्याचे निरिक्षण करण्यात येईल.

तरी अपिलाची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. सदर **अपिलाची पुनर्सुनावणी दिनांक ०५.०५.२०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजता** आयोगात प्रत्यक्ष आयोजित करण्यात येत आहे. तरी अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वत: उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील.

State Information Commission ★ Maharashtra ★

**मुंबई**
**दिनांक : ३१.०३.२०२२**

**(सुमित मल्लिक)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**